


# बालभवनातलं शिक्षण

## शोभा भागवत

**मु**लं समोर असली की मोठ्यांची आवाजाची पट्टी वरची होते. त्यांनी सांगितलेलं ऐकावं, आज्ञाधारक असावं अशी अपेक्षा असते. भीती, दहशत, हुकूमत यांना मुलं सामोरी जात असतात. मी बोलणार, तुम्ही ऐकणार. गप्प बसा. हाताची घडी तोंडावर बोट! परिणाम म्हणजे त्यांचा खळाळता उत्साह, जिवंतपणा, आनंद दबून जातो. २९ वर्षांपूर्वी बालभवन सुरू झालं तेव्हा माझ्या मनात काही गोष्टी स्पष्ट होत्या. शाळेनंतर मुलं इथे येणार दमून येणार तेव्हा त्यांना उत्साह वाटेल, आनंद वाटेल असंच काही इथे घडलं पाहिजे. घरी आणि शाळेत जे आनंदाचे अनुभव त्यांना मिळत नाहीत ते इथं मिळायला हवेत. त्यांच्या स्वातंत्र्यावर गदा येता कामा नये. ताई प्रेमळ असायला हवी. तिची भीती वाटू नये. तिच्याशी गप्पा माराव्यात असं मुलांना वाटलं पाहिजे. मुलांना कुठेही जायला बंदी नको. अगदी माझ्या ऑफिसमध्येही मुलं त्यांना वाटेल तेव्हा येऊ शकली पाहिजेत. गटात न जाता मुलं इतर कुठे खेळत असतील तर त्यांना कोणी ओरडू नये. तरीही बालभवनच्या दीड तासाचं शैक्षणिक मूल्य कमी असू नये. रोज आपल्याला काहीतरी नवीन करायला मिळणार या उत्सुकतेनं मूल आलं पाहिजे. कंटाळून त्यानं येऊ नये. बालभवन त्याला आपलं वाटलं पाहिजे.

आज २९ वर्षांनंतर मला असं वाटतं आहे की हे आम्हाला बऱ्यापैकी जमलं आहे. नाहीतर जिथे कोणतीही परीक्षा नाही, जिथे कोणी परीक्षेचं सर्टिफिकेट देत नाही तिथे अजून मुलांची प्रतीक्षा यादी का ठेवावी लागेल?

एकदा एका प्रेरणा प्रबोधन शिबिरात (आंतरभारती तर्फे मे महिन्याच्या सुट्टीत शिक्षकांसाठी होणारी शिबिरे) कऱ्हाडच्या घळसासी सरांनी सांगितलेली दोन उदाहरणे माझ्या कायम लक्षात राहिली आहेत. मी अनेक ठिकाणी ती सांगितली आहेत. ते म्हणाले, ''एकदा मी वर्गात बेडूक कापून दाखवला. पद्धत अशी होती की काम झाल्यावर तो बेडूक तिथेच मुलांच्या देखत कचरा बादलीत टाकायचा आणि शिक्षकांनी निघून जायचं. माझ्या मनात आलं याचा मुलांच्या मनावर काय परिणाम होत असेल? मी वेगळा प्रयोग केला. बेडूक कापून दाखवण्याचं काम झाल्यानंतर मी मुलांना विचारलं, 'हा बेडूक वर्गात आणला तेव्हा कसा होता?' मुलं म्हणाली, 'छान होता. इकडे तिकडे आमच्याकडे पाहत होता. उड्या मारत होता.' 'मग आपणं त्याचं काय केल?' 'आपण त्याला मारून टाकलं.' 'कशासाठी मारलं? 'आपल्याला त्याच्या आतलं बघायचं होतं ना?' 'म्हणजे आपल्याला ज्ञान मिळावं म्हणून आपण त्याला मारलं. आपल्या ज्ञानासाठी त्यानं बलिदान केलं हो ना?' 'होऽऽ' 'मग आपल्यासाठी एवढं करणाऱ्या बेडकाला आपण कचऱ्यात फेकून द्यायच?' 'नाही.' मुलांनी थोडा विचार केला आणि म्हणाली, 'आपण त्याला शाळेच्या बाहेर झाडाखाली खड्डा खणून पुरूयात आणि त्यानंतर सदाफुलीचं झाड लावूया. आम्ही त्याला रोज पाणी घालू.' माझा मुद्दा मुलांना बरोबर कळला होता. कृतज्ञतेचा एक छोटा धडा मुलांना मिळाला होता. घटनेचा अर्थ त्यांना लावता आला होता आणि बेपर्वाई, बेदरकारपणापासून त्यांना मी एक पाऊल मागे आणलं होतं.''

घळसासी सरांनी नववीतल्या मुलींना आणखी एक अनुभव दिला होता. ''एकदा मी मुलींना म्हटलं, उद्या तुम्ही बरोबर छत्र्या आणा. आपल्याला उन्हात बाहेर जायचं आहे. बरोबर भरपूर पाणी आणा आणि दोन माणसांना पुरेल एवढा जेवणाचा डबा आणा. मुली दुसऱ्या दिवशी हे सारं घेऊन आल्या. सर आपल्याला सहलीला येणार असंच त्यांना वाटलं. मी त्यांना घेऊन जवळच्या पाझर तलावाच्या कामावर गेलो. रोजगार हमीचं काम होतं. तिथे मुलींनी पाहिलं की, त्यांच्या वयाच्या मुली दगड वाहत आहेत. सफाई करत आहेत. तेही भर उन्हात. तेव्हा प्रथम त्यांनी पटापट आपल्या छत्र्या बंद केल्या. जेवणाची वेळ झाली तेव्हा त्या म्हणाल्या, 'आज आम्ही या मुलींबरोबर डबा खाणार. त्या मुली आल्या तेव्हा एक शाळेची, एक

कामावरची अशा मुलींच्या जोड्या केल्या. मुलींनी त्या मुलींना पाणी प्यायला दिलं. प्रेमाने डबा खाऊ घातला. त्यांच्याशी गप्पा मारल्या. त्यांना कळलं की त्या मुली दिवसभर असं काम करतात आणि संध्याकाळी जी मजुरी मिळते त्यातून घरचं जेवण होतं. मुलींचा पाय तिथून निघत नव्हता. सहवेदनेचा एक धडा त्यांना नकळत मिळाला होता!!''

घळसासी सर म्हणाले होते,''नुसती पाठ्यपुस्तकं शिकवून चालत नाही. त्यातली मूल्यं शिकवायची तर अनुभव निर्माण करावे लागतात, योजावे लगतात.''

असंच अनेक प्रयोग गुरुकुलांमध्ये आपले ऋषी करत असत. गुरुकुल म्हणजे शाळा नव्हत्या. तिथे मुलं राहायची. शेती करायची. काम करायची. गुरं राखायची. ऋषीही आपल्या कामात असत. मुख्य म्हणजे शिकण्याच्या काळात मुलांचा दिनक्रम साधेपणाचा, कष्टाचा होता. चंगळवादाचा वारा तिथे नव्हता. मधूनच त्यांचा संवाद घडे. मुलं त्यांना शंका विचारत. त्या संवादातून, प्रसंगातून, अनुभवातून मुलांचं शिक्षण घडत असे. गुरू-शिष्यांच्या अशा अनेक गोष्टी आपण वाचतो. आश्रमातल्या मुलांना एकदा गुरुंनी एकेक कबुतराचं पिल्लू दिलं आणि जिथे तुमच्याकडे कोणी पाहत नाही तिथे जाऊन तुम्ही हे पिल्लू मारून या असं सांगितलं. मुलं गेली आणि पिल्लं मारून आली. एकच मुलगा रात्री खूप उशीरा आला आणि पिल्लू तसंच घेऊन आला. सगळे त्याला हसले. तो म्हणाला,''जगात अशी एकही जागा नाही जिथे आपल्याकडे कोणी पाहत नाही. जेव्हा जेव्हा मी ह्या पिल्लाकडे पाहतो आहे तेव्हा ते माझ्याकडे पाहतच आहे ना!'' ऋषींनी मुलांना आंधळ्या आज्ञाधारकपणातून बाहेर पडून विचार करा असं शिकवलं.

अशीच एक गोष्ट दुसऱ्या एका आश्रमातील आहे. ऋषींनी मुलांचे स्वभावाप्रमाणे तीन गट केले. त्यांना सांगितलं की,''शेजारच्या गावात मोठी आग लागली आहे. तीन गटांनी रोज तिथे जायचं. त्यांना लागेल ती मदत करायची आणि ज्या वाटेने गेलो त्याच वाटेवरून परत यायचं. तीन गटांनी तीन वेगळ्या वाटा करायच्या. मुलं जाऊ लागली. आठ दिवसांनी ती आपसात कुजबूजत होती. 'असं कसं झालं?' 'ऋषींनी विचारलं,'काय झालं?' तर मुलं म्हणाली,'एका गटाच्या वाटेवर काटे, दुसऱ्याच्या हिरवळ तर तिसऱ्याच्या वाटेवर फुलं उगवली?' ऋषी म्हणाले,'ज्यानं जसा धाम गाळला तसं तिथे उगवलं.' मुलं म्हणाली,'आम्ही सगळ्यांनीच घाम गाळला आहे.' ऋषी म्हणाले,'या, आपण बसून बोलूयात. मला आता एकेका गटाने एवढंच सांगा की, तुम्ही काय भावनेनं हे काम केलंत.?' काटेवाला गट म्हणाला,'उकाडा कोण! ती लोकं ना आपल्या जातीची ना पातीची. खूप झाली मदत त्यांना. आता आम्हाला कंटाळा आलाय.' हिरवळीवाला गट म्हणाला,'नाही म्हणजे आम्हाला उकाड्याचा त्रास होतो. पण तुम्ही आज्ञा केलीत तर ती पाळणं आमचं कर्तव्य आहे. नाहीतर कामं बऱ्यापैकी झालीत.'' फुलंवाला गट म्हणाला,'गुरुजी, खरं सांगू का? जेव्हा आम्हाला कळलं त्या गावात आग लागली आहे तेव्हापासूनच आम्ही जायला सुरुवात केली. आमची विनंती आहे की, आम्हाला अजून १५ दिवस जाऊद्या. नाहीतर ती कामं पुरी होणार नाहीत. आणि जेव्हा आम्ही त्यांची सेवा करतो तेव्हा आम्हाला वाटलं की आमच्या आजी-आजोबांचीच सेवा करतो आहोत. आमच्या आई-वडिलांचीचं घरं बांधून देतो आहोत. आमच्या धाकट्या भावंडांनाच आम्ही खेळवतो आहोत.' गुरुजी म्हणाले,'आता तुम्हाला कळलं का की ज्यानं जसा घाम गाळला तसं तिथे उगवलं असं मी का म्हटलं ते?''

तर गुरुकुलात शिकण्याची पद्धत अशी होती. पोपटपंचीने काही होत नाही. प्रत्यक्ष हातांना काम हवं. त्याचा मनावर, बुद्धीवर परिणाम हवा. आज मुलं कोरडी होत चालली आहेत. त्यांना कुणाविषयी प्रेम नाही. कुणाविषयी आदर नाही अशा वातावरणात बालभवननं काय करायला हवं? बालभवनला अभ्यासक्रमाचं बंधन नाही. तिथ स्पर्धा नाही, परीक्षा नाही. मग या वातावणाचा पुरेपुर लाभ मुलांना मिळायला हवा. विविध अनुभवांच्या मदतीने मुलांमध्ये मूल्यं पेरायची अशा हेतूनं अनेक गोष्टी केल्या. कार्यकर्त्याही तशाच मिळत गेल्या आणि मुलांच्या अनेक उद्गारातून वाटतं आपण बरं काम केलं!

मुलंपण आपल्याला शिकवतात असे कितीतरी प्रसंग घडतात. एकदा एक ८ वर्षाचा मुलगा मला भेटायला आज आणि म्हणाला,'आय वॉन्ट टु चेंज माय ग्रुप.' मी त्याला हो म्हटलं आणि विचारलं,'बट व्हाय?' तो म्हणाला,'माय टीचर डझंट नो हाऊ टु रिस्पेक्ट चिल्ड्रन.' मग त्याच्या ताईंशी बोलले आणि खरंच नकळत त्याचा अपमान झाला होता. दोघांची समजूत पटली. चूक पटली आणि समझोता झाला. सर्वांनाच एक धडा मिळाला.

एकदा चार वर्षाच्या गटाला ताईंनी हिरकणीची गोष्ट सांगितली. शेवटी शिवाजीमहाराजांनी तिला मोठं बक्षीस दिलं असं म्हणून ताई थांबली. काय बक्षीस दिलं सांग ना म्हणून मुलं हटून बसली. ती म्हणाली,'तुम्ही सांगा काय

दिलं असेल?' एकजण म्हणाली,'कॅडबरी.' 'हे, मोठ्या माणसांना देतात का?' दुसरा म्हणाला. त्यावर तिसरी म्हणाली,'चप्पल. म्हणजे काटेकुटे लागू नयेत.' एकजण म्हणाला,'प्लास्टिकचं मडक्रं. म्हणजे दूध सांडणार नाही.' एक मुलगी म्हणाली,'टॉर्च, टॉर्च. म्हणजे अंधार झाला तरी तिला दिसेल.' शेवटी एक मुलगी म्हणाली,'घड्याळ. हातावरचं घड्याळ. म्हणजे ती बरोबर सहाच्या आत बाळाजवळ पोहोचेल. दिवसभर घड्याळ बघेल.' आपल्याला या शक्यता सुचणारच नाहीत. ताईनं जर शेवट सांगून टाकला असता तर मुलांचे हे विचार बाहेरच आले नसते.

बालभवनात प्रत्येक उपक्रमातून मुलं नवीन काही शोधून काढत असतात. नवीन अनुभव घेत असतात. नवं शिकत असतात. ताईंचं आपापसातील प्रेम, सौहार्द, मृदुता मुलांपर्यंत पोहोचत असते. त्यांना बालभवन 'आपलं' वाटतं. ताईंमुळे उपक्रमांची विविधता मुलं अनुभवतात. कुणी त्यांना गडावर ट्रेकिंगला नेते तर कुणी पर्वतीवर कचरा वेचायला, एखादी ताई मे महिन्यात दहा दिवस 'चालत चालत पुणे बघू' म्हणत पुण्याच्या इतिहासाची, भूगोलाची, कलात्मक इमारतींची, सामाजिक वास्ववाची ओळख करून देते. काही ताया मिळून १५ दिवस 'खुलजा सिम सिम शिबीरं' घेतात. त्यात मुलांना स्वयंपाकासह खूप गोष्टी करायला मिळतात. तीन-चार जणी दीड ते चार वर्षांच्या मुलांचं 'ज्यूनिअर गडबड शिबीर' घेतात. त्यात मुलं आणि त्यांच्या आयादेखील रंगांशी, रंगीत पाण्याशी, फुग्यांशी मनमुराद खेळतात. एखादा दादा हॉकीची टीम तयार करतो तर एखादा मुलांना शेतीची गोडी लावतो. एखादी ताई फुलपाखरांची अंडी बरणीत ठेवून अळी-कोश-फुलपाखराचा जन्म मुलांना दाखवते, एखादा गट आपल्या गटाजवळच्या झुडपातलं शिंपी पक्ष्याचं घरटं गुपचूप बघत राहतो आणि त्या पिल्लाचा जन्म अनुभवतो. एखादे उत्साही कलावंत पालक सर्व मुलांना चित्र काढायची संधी देऊन हॉल चित्रांनी भरून टाकतात आणि तो मुलांचा आनंद बघून त्यांना झालेली कविताही त्यावर लिहितात असं हे फुलपाखरी साम्राज्य बालभवनात नांदतं.

बालभवनात कशालाच आडकाठी नाही. फक्त इतरांना त्रास द्यायला बंदी आहे. छोट्या मुलांचा एखादा गट सर्व वेळ ग्राउंडवरच्या काड्या जमवून चिमणीचं घरटं करणे आणि त्यात कापसाची अंडी करून ठेवणे यात दंग असतो. एखाद्या गटातली चार मुलं मोठ्या सँडपिटमध्ये छोट्या वस्तू लपवून ठेवतात आणि मग उरलेला गट उत्खनन करताना, त्यांची गंमत पाहतात. उन्हाळा सुरू झाला की, मोठी मुलं छोट्यांसाठी आणि सर्वांसाठीच लिंबाचं सरबत बनवितात आणि खांद्यावर नॅपकिन टाकून लगबगीनं ते सर्वांना देतात. एखादी ताई सर्व मुलांना निदान बालभवनमधील ५०-६० झाडं नावानिशी ओळखता यायला हवीत असं म्हणते तर एखादी छोट्याशा फुलबागेचं स्वप्न प्रत्यक्षात आणू पाहते. दोघी-चौघी धीट ताया दर मे महिन्यात मुलांना ४-५ दिवस मुक्काम शिबीराला नेतात. कधी सोलापूरजवळ अंकोलिला, कधी फलटणला, कधी तळेगावला, कधी पाचगणीला. तिथे मुलं त्या भागातल्या ग्रामीण मुलांबरोबर राहतात. काम करतात. तिथल्या घरांवर चित्रं काढून देतात. नव्या नव्या गोष्टी शिकून येतात.

उपक्रम तर अनेक चालूच राहतील पण त्यांच्यातून मुलं काय शिकतात हे महत्त्वाचं. ताईंना मी एकदा म्हटलं आपण एवढे उपक्रम करतो पण त्यातून मुलं

१) सामाजिक जाणीव शिकतात का? २) त्यांना पर्यावरण रक्षणाची जाण येते का? ३) त्यांना श्रमप्रतिष्ठा कळते का? ४) मुलं धाडस शिकतात का? ५) त्यांच्यात कलात्मकता येते का? ६) स्त्री-पुरुष सख्य आपण कसं शिकवतो? ७) त्यांना स्वयंपाक येतो का? ८) त्यांची संवेदनशीलता वाढते का? ९) ती कृतीशील व्हावीत यासाठी आपण काय करतो? १०) त्यांची संवादकौशल्ये इथे वाढतात का? ११) ती इथे कोणती मूल्यं शिकतात? १२) त्यांना व्यसनांबद्दल आपण काय सांगतो? १३) त्यांना विज्ञाननिष्ठा आपण शिकवतो का?

तेव्हा प्रत्येकीने तिला काय वाटतं ते लिहून दिलं. एका ताईनी त्याचं संकलन करून दिलं. तो तक्ता सर्वांनाच उपयोगी पडेल म्हणून देते आहे. प्रत्येक विषयातल्या निवडक पाच-सात गोष्टी दिल्या आहेत.

### (१) सामाजिक जाणीव-

१) आपला प्रत्येक बालदिन आपण १० बालभवन आणि १० वंचित मुलांच्या संस्था यांना एकत्र करून साजरा करतो.

२) दिवाळीच्या कार्यक्रमात आपण एका वंचित मुलांच्या गटाला सहभागी करून घेतो.

३) गरजू मुलांसाठी मदत गोळा करतो.

४) सुट्टीतल्या शिबीरात कायमच विशेष मुलांचा सहभाग असतो.

५) स्नेहसंमेलनाचे विषय ठरविताना मुलांची सामाजिक जाणीव वाढेल असे विविध विषय शोधतो.

### (२) पर्यावरण रक्षण-

१) प्लॅस्टिकच्या पिशव्या न वापरता कापडी पिशव्या वापरणे.

२) दिवाळीत फटाके न उडवणे.

३) घरात ओला कचरा-कोरडा कचरा वेगळा ठेवणे.

४) हस्तकलेसाठी नैसर्गिक वस्तू वापरणे.

५) शेती करून भाज्या उगवणे.

६) शाडूच्या मातीचे गणपती स्वत: करणे.

७)वह्या, कपडे, बूट प्रमाणात वापरणे. (जास्त वस्तू वापरणे म्हणजे वृक्षतोड जास्त)

**(३) श्रमप्रतिष्ठा-**

१) रोज घरी एकतरी काम करणे.

२) रोज गटाची जागा साफ करणे.

३) सुतारकाम, रंगकाम करणे.

४) कार्यक्रमानंतर सतरंज्या, खुर्च्या उचलणे.

५) स्वयंपाक करणे.

६) झोपडी बांधायला शिकणे.

**(४) धाडस-**

१) ट्रेकचे आयोजन करणे.

२) वयानुसार खेळ कठीण करणे.

३) झाडाला टांगलेली दहीहंडी फोडणे.

४) झाडावर चढणे.

५) शेकोटीला रात्री न घाबरता राहणे.

**(५) कल्पकता-**

१) नाटकांसाठी पोषाख, नेपथ्य करणे.

२) रोजच्या व्यायामात वैविध्य आणणे.

३) हस्तकलेचे विविध प्रकार शोधणे.

४) गंमतजत्रेचे नवनवीन खेळ मांडणे.

५) पाना-फुलांचे गुच्छ करणे.

**(६) स्त्री-पुरुष सख्य-**

१) मोठ्या मुलामुलींनी एकत्र खेळणे.

२) दोघांना समान जबाबदारी.

३) मुलींची उगीचच बाजू न घेणे.

४) खाऊ करताना दोघांचा सहभाग.

५) फूटबॉल, हॉकी अशा खेळात मुलींना अग्रक्रम देणे.

६) गोष्टी सांगताना स्त्रियांना कमीपणा आणणारे उल्लेख न करणे.

**(७) स्वयंपाक-**

१) शिबीरात खाऊ करताना मदत.

२) घरी आईला स्वयंपाकात मदत.

३) गॅस न लागणारे पदार्थ मुलांना शिकवणे.

४) सोपे पदार्थ करायला शिकवणे.

५) स्वयंपाकाच्या तयारीची, साहित्याची माहिती.

**(८) संवेदनशीलता-**

१) एकमेकांना न मारणे.

२) विशेष मुलांच्या गरजा जाणणे.

३) झाडाफुलांची काळजी घेणे.

४) संवेदनशीता शिकवणाऱ्या गोष्टी, गाणी, कविता.

५) मोठ्यांनी छोट्यांची काळजी घेणे.

**(९) कृतीशीलता-**

१) ताई स्वत: ॲक्टिव्ह हवी.

२) एखाद्या गंभीर घटनेनंतर स्वत: कशी मदत करणार ते ठरवणे, करणे.

३) संस्थेपुढील प्रश्न सोडविण्यासाठी कृतीची आखणी.

४) प्रत्येक काम हौसेने करणे.

५) सर्व कामांमध्ये सहभाग घेणे.

**(१०) संवादकौशल्य-**

१) उपक्रम ठरविण्यासाठी मुलांशी चर्चा, रोजच्या गप्पा.

२) मोठ्या मुलांनी छोटा गट सांभाळणे.

३) वृत्तपत्र, टी.व्ही. बातम्यांची चर्चा.

४) अबोल मुलांना बोलकं करणे.

५) दुसऱ्या गटाच्या ताईंशी, मुलांशी संवाद.

६) गोष्टींची नाटकं करणे.

**(११) विज्ञाननिष्ठा-**

१) भुतांविषयी गप्पा.

२) अंधश्रद्धांविषयी प्रयोग.

३) आयुका सायन्स पार्क सहली.

४) वैज्ञानिक खेळणी व तत्त्व समजून घेणे.

**५) विज्ञाननिष्ठ विचार करणे.**

(१२) व्यसनांपासून दूर-

१) गोळ्या-बिस्किटांचं व्यसन.

२) पिझ्झा, बर्गर, मॅगी, आइस्क्रिम, कोल्ड्रिंक.

३) टी.व्ही. पाहण्याचा वेळ.

४) कॉम्प्यूटर गेम, मोबाईल गेम पासून सावध.

५) मोठ्या मुलांशी दारू, तंबाखू, अमली पदार्थ यांविषयी बोलणे.

**(१३) मूल्य-**

१) मूल्य शिकवणाऱ्या गोष्टी सांगणे.

२) पर्यावरण रक्षणाचे विविध उपक्रम.

३) मुलांच्या हातून घडलेल्या चुकांची चर्चा.

४) स्वच्छता करणे.

५) चांगल्या सवयींचा सराव.

६) वस्तू नीट वापरणे.

७) चुकीचे वागणाऱ्या मुलांशी इतरांनी नॉर्मल वागणे.

८) प्रेम-शांती यांचे अनुभव.

मूळ यादी यापेक्षा बरीच मोठी आहे. बालभवनच्या कामात भावनेचा अभाव असणं ही टाळायची गोष्ट आहे. ताईंची प्रत्येक स्टाफ मिटींग हा प्रशिक्षणाचाच भाग असतो. आम्ही असं म्हणतो की तीन वर्षाचं मूल बारा वर्षापर्यंत बालभवनात सातत्यानं आलं तर त्याचे १०० व्यायामप्रकार तयार होतात. १०० खेळ ते खेळू शकतं. १०० कला हाताळणं, १०० ठिकाणं, १०० चांगल्या माणसांना भेटतं., १०० गोष्टी ऐकून होतात., कितीतरी पुस्तकं वाचून होतात आणि हाताला विविध कामांची सवय होते. हे सगळं सहज घडतं आणि आनंदानं घडतं.

सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ श्री. जे.पी.नाईक म्हणत 'शाळांबाहेर काही चांगले उपक्रम निर्माण झाले तर शाळा त्यामुळे समृद्ध होत जाते. बालभवन हा असा शाळांना पूरक असा उपक्रम आहे.

शाळेत जे करायला मिळत नाही ते मुलं बालभवनात अनुभवू शकतात त्यामुळे त्यांचं शिक्षण पूर्ण होतं ते शाळेत झिरपतं.' बालभवनात काम करताना मुलांचे अनेक प्रश्न लक्षात येतात. त्यांचा संबंध पालकांच्या वागण्याशी, वृत्तीशी असतो. मग पालकांशी बोलताना लक्षात येतं की, नुसतं बोलून, सांगून, सुचवून प्रश्न सुटणार नाहीत. त्यांना समुपदेशनाची गरज आहे आणि त्याचबरोबर पालक शिक्षणाचीही. पालक शिक्षणाचे कार्यक्रम, कार्यशाळा बालभवनात होतात. पण असंही वाटतं की तरूणपणी मुलामुलींनी लग्न म्हणजे काय?, संसार म्हणजे काय?, मुलांची जबाबदारी म्हणजे काय?, करिअर म्हणजे काय? याचा विचार करायला हवा. अभ्यास करायला हवा. त्यासाठी मुलं कॉलेजमध्ये असतानाच 'विवाह-अभ्यास' हा विषय त्यांच्यापर्यंत पोहोचला तर बरे होईल. मग मुलगे 'सुंदर मुलगी' या सापळ्यातून आणि मुली 'श्रीमंत मुलगा' या कल्पनेतून मुक्त होतील. विवाह-अभ्यासातून मुलं स्वत:ला ओळखायला शिकतील. दुसऱ्याचा सन्मान करणं आवश्यक आहे हे त्यांना कळेल. मुलांची जबाबदारी घ्यायची तर आधी स्वत: संयमी, प्रामाणिक, संवेदनशील, अभ्यासू, समजूतदार बनावं लागेल. मी रागीटच आहे, मी आळशीच आहे असं म्हणून चालणार नाही. कारण मुलं वाढवणं हा स्वत:च्या विकासाचाही भाग असतो.

बालभवन म्हणजे नुसतं 'ग्राउंड' नाही ती आनंदानं शिकण्याची, वाढण्याची जागा आहे. मुलांची, ताईंची, पालकांची आणि सातत्याने प्रशिक्षणाला येणाऱ्या प्रशिक्षणार्थींचीही. फक्त सभासदांची नाही तर आवर्जून आमंत्रित केल्या जाणाऱ्या वंचित मुलांची. बाहेर गावाहून येणाऱ्या पाहुण्या मुलांचीही. सध्या मी आमच्या ताईंना म्हटलं, 'तुम्ही प्रत्येकीने स्वत:च्या कल्पनेने, बुद्धीने एक प्रकल्प ठरवा. महिन्याभरासाठी. त्यातून तुमची गुणवत्ता वाढली पाहिजे. मुलांना त्याचा उपयोग झाला पाहिजे. प्रकल्प अर्थपूर्ण हवा. आपल्या आयुष्याशी जोडलेला हवा. काहीतरी नवीन हवा. जे तुम्ही आजवर केलं आहे ज्याची तुम्हाला सवय आहे किंवा ज्यात फारसे कष्ट नाहीत असे काही निवडू नका.' ताईंकडून लगेच प्रश्न आला, 'कोणत्या वयोगटासाठी?' मी म्हटलं, 'वयोगट अमूक तमूक हा विचार करू नका. तुम्ही कॉलेजच्या मुलांसाठी काही ठरवलंत तरी चालेल. तुमच्या लक्षात येतं का की अनेक वर्ष इथे काम करून आपण आपल्याच कामाचा एक तुरुंग स्वत:भोवती उभारतो आणि त्याच्या बाहेरच पडत नाही. तुम्ही त्याच्या बाहेर पडावं असं मला वाटतं.' आता त्या प्रकल्प तयार करण्याच्या प्रयत्नात आहेत. शिक्षणातले असे तुरुंग मधे मधे तोडावे लागतात नाहीतर तेच तेच करत शिक्षकांचा रसच संपतो. समोर मुले तर उत्साहाने सळसळणारी असतात. ही तफावत कमी करावी लागते. मुलांच्या मनगट, मन, मेंदूला जसं खाद्य पुरवायचं तसं शिक्षकांच्याही आणि मुख्याध्यापकांच्याही!

बालभवनची पुण्यात मध्यवर्ती ठिकाणी मोठी जागा आहे. त्यामुळे तिची किंमत खूप आहे. तिच्यावर बरीच आक्रमणे झाली. तेव्हा जागरूक नागरिकांनी पालकांनी तिचं संरक्षण केलं. आपल्याला जमिनीची किंमत कळते पण मुलं अमूल्य आहेत, अनमोल आहेत हे कधी कळणार? अशा जागा मुलांसाठी कायमच्या राखून ठेवण्याची गरज आहे.

चार-पाच वर्षांपूर्वी काझूहीरो आणि नाओको अशा नावाचं एक जपानी जोडपं बालभवनात आलं होतं. काझूहीरो मानसोपचारतज्ज्ञ होता आणि नाओको शिक्षिका. ते दोधं ८-१० देशांचा दौरा करायला निघाले होते. ते सांगत होते की जपानमध्ये शाळेतून गळणाऱ्या मुलांचं प्रमाण वाढत आहे. मुलांच्या आत्महत्येचं प्रमाण वाढत आहे त्यामुळे मुलं कुठे आनंदानं शिकतात त्याचा शोध आम्ही घेतो आहोत. ते आठ दिवस बालभवनात आले. मुलांशी खेळले. त्यांना ओरीगामी शिकवली. जपानी गाणं शिकवलं. मुलंही त्यांना 'माझा काजूदादा' 'नाओकोताई' म्हणून चिकटवली. त्यांना फार आनंद झाला. ते जाताना म्हणाले, 'दो नतीन महिन्यांनी आम्ही इथे परत आलो तर चालेले का? 'आमच्या शाळा सोडलेल्या दोन विद्यार्थिनींना आणायचं आहे.' आम्ही आनंदानं हो म्हटलं. ते पुन्हा आले सगळे पुन्हा आठ दिवस राहिले. त्या मुली एकदा मुलांना दाखवायला किमोनो घालून आल्या. त्यांनी सर्वांनी जपानी शेतकरी नृत्य केलं. आणि मुली जाताना आम्हाला मिठ्या मारून रडत होत्या. या भेटीचा त्यांच्यावर चांगला परिणाम णाला. दोघी परत शाळेत जाऊ लागल्या आणि त्यातली एक छोट्या मुलांच्या शाळेत मदतीला जाऊ लागली.

माझ्या मनात आलं भविष्यात भारतीय संशोधकांवर ही वेळ येईल का? आणि मग कोणीतरी म्हणेल, ''मैदानं होती तोवर मुलं आनंदी होती. आता मैदानं उरली नाहीत. त्यामुळे मुलांचे प्रश्न वाढलेत.''

अशी वेळ कुठल्याच गावावर, देशावर न येवो! आनंदानं खेळण्याच्या जागा ह्या मुलांचं शारीरिक, मानसिक, भावनिक, सामाजिक, सांस्कृतिक आरोग्य जपण्याचं काम करत असतात. पर्यायानं समाजाचंही!

**भ्रमणध्वनी :**